**शपथेवर पुढील सरतपास ॲड. ई. ए. राहाटे गैरअर्जदारातर्फे :—**

०५. शपथपत्र नि.क्र. सी—१०७ मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

०६. आता मला नि.क्र. सी—५९ वरील दस्तावेज क्र. २ दाखविण्यात आले. सदर दस्त चौकशी रिपोर्टची सत्यापीत प्रत आहे. सदर दस्ताला **नि.क्र. सी—१०९** देण्यात येते.

पुढील सरतपास पुर्ण.

**उलटतपास तक्रारदार यांच्या तर्फे ॲड. जे. एम. पाटील यांचे मार्फत :—**

०७. दिनांक २२.१०.२०१० रोजीचे पत्र मी सदर प्रकरणामध्ये दाखल केले नाही. हे म्हणने खरे नाही की, मी राजुरा येथे कार्यरत असतांना सहायक निंबधक म्हणून कार्यरत होतो. हे म्हणने खरे आहे की, राजुरा तालुका येथील सर्व सहकारी संस्था माझे देखरेखीत होते. तक्ररदार व्यवस्थीतपणे काम करीत नाही याबाबत मी त्यास पत्रव्यवहार केले होते. सदर पत्रव्यवहाराच्या संदर्भात मी कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केला नाही.

०८. माझी संस्था तालुका देखरेख सहकारी संस्था, राजुरा आहे. सन २०१०—११ मध्ये कर्ज ना मिळल्याबाबतच्या शेतकरी

सभासद यांच्या तक्रारी मी सदर प्रकरणामध्ये दाखल केल्या नाही. हे म्हणने खरे आहे की, शेतकरी सभासद यांनी पुर्वी घेतलेल्या कर्जाची रक्कम परतफेड केल्याशिवाय त्याला नविन कर्ज वाटप करता येत नाही. आता मला नि.क्र. यु—४० वरील कर्जवाटपाची यादी दाखविण्यात आली. सदर यादीप्रमाणे कर्ज वाटप करण्यात आले होते किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. मी नि.क्र. सी—१०९ वरील अहवाल तयार करण्याकरीता सभासदांनी दिलेल्या पावत्या, गैरअर्जदार यांनी दिलेल्या कॅशबुक खतावणी, असे दस्तावेजांचे अवलोकन केले होते. या व्यतीरीक्त मी इतर कोणतेही दस्त किंवा अभिलेख तपासले नाही. मी वरील सांगितलेल्या पावत्या शेतक—यांनी स्वतः आणून दिल्या होत्या. त्या शेतक—यांचे असे म्हणने होते की, आम्ही कर्जाची रक्कम तक्रारदार यांचेकडे जमा केली आहे परंतू त्यांनी बॅंकेत भरली नाही व कॅशबुकमध्ये नोंद घेतली नाही. तसेच त्यांनी सांगितले की, कर्ज खात्याच्या खतावणी मध्ये त्यांची नोंद दाखवून कर्ज निरंक दाखविण्यात आले.

०९. शेतक—यांनी सन २००९—२०१० मध्ये बॅंकेला तसेच संस्थेला पावत्या आणून दिल्या होत्या. तारीख मला सांगता येणार नाही. मी सदस्य सचिव म्हणून राजुरा येथे कधी पासून कधी पर्यंत कार्यरत होतो त्याचे दिनांक मला सांगता येणार नाही. मी राजुरा येथे २००७ मध्ये आलो होतो व सन २०१० मध्ये माझी बदली झाली. मी कास्तकारांकडून पावत्या जप्त केल्या नव्हत्या. हे म्हणने खरे आहे

की मी कास्तकाराने दिलेल्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती वरून नि.क्र. सी—१०९ वरील अहवाल सादर केला .

१०. हे म्हणने खरे आहे की गैरअर्जदार क्र. २ यांचे संस्थेचे लेखापरीक्षण झाले होते व ते श्री चिताडे यांनी केले. हे म्हणने खरे नाही की दिनांक १.४.२०२० ते ३१.३.२०११ या कालावधीकरीता श्री चिताडे यांना कोणतेही अंकेशन करण्याचे आदेश देण्यात आले नव्हते. हे म्हणने खरे आहे की, ज्या वर्षाचे लेखापरीक्षण बददल आदेश देण्यात येते त्याच वर्षाचा लेखा परीक्षण करण्यात येते. गडचांदूर शाखेचे निरीक्षण मध्ये श्री जोगी यांनी गैरअर्जदार क्र. २ संस्थेचे संपुर्ण रेकार्ड कधी तपासले हे मला सांगता येणार नाही. सदर तपासणी करीता कोणी आदेश दिले हे मला सांगता येणार नाही. त्यांनी मला त्यांचा तपासणी अहवाल सादर केला नाही.

११. हे म्हणने खरे नाही की, सभासदांच्या कर्ज खतावणीमध्ये नोंदी नव्हत्या व ज्याने कर्जाची वसूली दिली त्यांची नोंद कॅशबुकला न घेता खतावणीला जमा दाखवून कर्ज बाकी निरंक दाखविल असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की, कॅशबुक व कर्ज खतावणी बाबत मी श्री जोगे यांचे अहवालावरून सांगत आहे.

१२. हे म्हणने खरे आहे की, गैरअर्जदार क्र.२ संस्थेचे करंट खाते व बचत खाते सीडीसीसी बॅक शाखा गडचांदुर येथे होते. हे म्हणने खरे आहे की, मी सदर करंट खाते व बचत खात्याची कोणतीही तपासणी केली नाही. हे म्हणने खरे आहे की, मी

गैरअर्जदार क्र.२ संस्थेच्या वरील बॅक खात्यामध्ये कोण कोणते आर्थिक व्यवहार झाले हे कोणताही उपापोह बाबत नि.क्र. सी.—१०९ मध्ये उल्लेख केलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, संस्थेचे आर्थिक अफरातफर झाली असे आरोप करतांना संस्थेचे बचत खाते आणि करंट खाते तपासणे गरजेचे होते. हे म्हणने खरे आहे की, गैरअर्जदार क्र. २ संस्थेच्या खात्यात भरणा केलेल्या रक्कमाचे व्यवहार गडचांदुर येथील वरील खात्यामध्ये होत होते.

१३. हे म्हणने खरे नाही की, तक्रारदार यांनी गैरअर्जदार क्र.२ संस्थेला व वरील बॅकेला भरणा केलेल्या रक्कमांच्या पावत्यांची मांगणी केली होती. हे मला माहीत नाही की भरणा केलेल्या रक्कमांच्या पावत्या देण्यास गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी टाळाटाळ केली. हे मला माहित नाही की दिनांक १७.१२.२००९ रोजीच्या ठरावाप्रमाणे संस्थेने भेंडवी ग्रांमपंचायत यास समाजमंदीर भाडे तत्वावर मागणी करण्याचे ठराव पारीत केले. हे मला माहीत नाही की तसेच ठरावामध्ये डेडस्टॉक खरेदीसाठी ठराव पारीत करण्यात आले होते. हे म्हणने खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. २ संस्थेचे ठराव बुकाचे पाहणी न करता खोटा अहवाल सादर केला.

१४. हे मला माहित नाही की, दिनांक ११.०१.२०१० रोजीच्या गैरअर्जदार क्र. २ संस्थेच्या पत्राप्रमाणे ग्रामपंचायत भेंडवी यांनी समाज मंदीर भाडयाने दिले होते. दिनांक २७.७.२०१० रोजी मी कॅशबुक तपासले होते. सदर कॅशबुक मी तपासणीचा भाग म्हणून तपासले होते. मला कोणत्या तारखेला तपासणीचे अधिकार देण्यात आले हे मला

सांगता येणार नाही. त्या बाबतचे कोणतेही दस्तावेज मी अभिलेखावर दाखल केले नाही. माझे पुराव्यातील परिच्छेद क्र.३ मधील पहिल्या ६ ओळी माझेशी संबंधीत नाही.

१५. उघडयावर पडलेल्या पावतीबुक बाबत माहिति मला बॅकेने दिली. त्याची तारीख मला सांगता येणार नाही. मी नि.क्र.यु—२८ वरील पंचानाम्याच्यावेळी हजर होतो. हे म्हणने खरे नाही की मी माझे पुराव्यामध्ये सांगितलेले ३१ व २२ पावत्या तक्रारदार यांनी तयार केल्या नाही. हे म्हणने खरे नाही की त्या पावत्या प्रमाणे ज्या लोकांनी रक्कम भरली त्यावर त्यांच्या सहया नाहीत. हे म्हणने खरे नाही की त्या पावत्यावर तक्रारकर्त्याच्या सहया नाहीत. हे म्हणने खरे नाही की त्या पावत्या श्री पाचखेडे यांचे सांगण्यावरून खोटया तयार करण्यात आल्या व तक्रारकर्ता यांच्या नावाने खोटया सहया करण्यात आल्या. सदर पावत्यांवर तक्रारकर्ता यांची सही पडताळणी बाबत हस्ताक्षर दज्ञ यांचे अहवाल घेण्यात आले नाही.

१६. कोदेपुर संस्थेचे पावतीबुक वापरल्याबाबत मी अभिलेखावर कोणतेही दस्त दाखल केले नाही. हे म्हणने खरे आहे की नि.क्र. सी—६० वरील कॅशबुक संस्थेच्या कोणत्याही पदाधिका—यांनी पडताळणी व सत्यापीत केली नाही. दिनाक ३.८.२०१० रोजी पंचनामा करतांना तक्रारदार यांनी दिनांक २.८.२०१० रोजी बॅकेमध्ये आणलेल्या रेकार्डची मागणी केली होती याबाबत मला कोणतीही माहिति देण्यात आली नाही. हे मला सांगता येणार नाही की, तक्रारकर्ता यांनी गैरअर्जदार यांचेकडे दिनांक २९.०७.२०१० पर्यत

काम केले. हे मला माहित नाही की तक्रारदार यांनी निक्र. सी—१९ वरील अर्ज सहायक सचिव यांना दिला होता. हे मला माहित नाही की तक्रारदार यांनी डिमांड लिस्ट, डिमांड लिस्ट सादर करण्याबाबतचा अर्ज, सदस्य सचिव तालुका देखरेख यांना दिला होता. हे म्हणनेखरे नाही की मी पगार निधी बाबत शहानीशा केली नव्हती. हे म्हणने खरे नाही की म्हणून मी त्याबाबत उल्लेख नि.क्र. सी—१०९ मध्ये केला नाही.

१७. हे म्हणने खरे नाही की गैरअर्जदार क्र. २ संस्थेच्या खात्यातून रक्कमा कुठेकुठे गेल्या याबाबत चौकशी करणे माझे कर्तव्य होते. हे म्हणने खरे नाही की, मी नि.क्र. १०९ वरील चुकीचा अहवाल गैरअर्जदार क्र. १ यांना सादर केला. हे म्हणने खरे नाही की , माझे चुकीच्या अहवालावरून नि.क. यु—६९ वरील अहवाल तयार करण्यात आला. हे म्हणने खरे नाही की मी सादर केलेल्या अहवालामधील सर्व मजकुर व माझे सरतपासामधील मजकुर खोटा आहे. हे म्हणने खरे नाही की, तक्रारकर्त्या यांचे विरूध्द त्यांनी खोटया पावत्या तयार करून रू १६,८३,९१३/—ची खोटी अफरातफर दाखविण्यात आली आहे.

१८. गैरअर्जदार क्र.१ चे वरीष्ठ लिपीक श्री पाचखेडे यांना मी ओळखत होतो. हे मला सांगता येणार नाही की तक्रारदार हे भेडवी येथे दिनांक २४.११.२००९ ते २९.०७.२०१० पर्यत कार्यरत

होते. हे म्हणने खरे नाही की माझे व श्री पाचखेडे यांचे चांगले संबध असल्याने मी खोटा अहवाल तयार केला व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा—

(एम. ए. हुसेन)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ०८.०७.२०२६.